RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८५

दि.२३ जुलै २०२६, वार : गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांचे स्वागत

**लातूर/ प्रतिनिधी:** येथील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी म्हणून मंगळवारी रोहिणी कुंभार यांनी पदभार स्वीकारला असता राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी त्यांचे फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषदेतील भाजपचे गटनेते रामचंद्र तिरुके, प्रा. बी. बी. खटके, प्रा. आर. ए. बदने, प्रा. आर. एन. पटणे, विष्णू कराड, आर. पी. मुंडे, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते. रोहिणी कुंभार या कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय कारभाराचा त्यांना दांडगा अनुभव आहे. नागपूरहून शिक्षणाधिकारी म्हणून त्यांची बदली लातुरात झाल्यामुळे लातूरच्या शिक्षण विभागाचा कारभार आणखी जोमाने पुढे जाणार असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## लातूर येथे २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस सोहळ्याचे आयोजन

**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत रविवार, २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजता लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे २७ वा कारगिल विजय दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कारगिल युद्धात देशसेवेसाठी अभूतपूर्व शौर्य गाजवणाऱ्या आणि बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व त्यांच्या परिवाराचा सन्मान करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, शौर्यपदकप्राप्त माजी सैनिक तसेच माजी सैनिकांच्या विधवा भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## तुमच्यामुळेच मी राजकारणात पाऊल टाकले, अमोल कोल्हे भावूक; दिलीप सोपलांना एका वाक्यातच व्यक्त केले सारे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांची आज पहिलीच जयंती. सहा महिन्यांपूर्वी अजित पवारांचे विमान दुर्घटनेत अकाली निधन झाले. २८ जानेवारीच्या सकाळी सकाळी अवघ्या महाराष्ट्राची झोप उडवून देणारी घटना माध्यमांतून समोर आली, ती म्हणजे अजित पवारांचे निधन. बारामतीजवळ अजित दादांचे विमान क्रॅश झाले अन् अवघा महाराष्ट्र सुन्न झालं, सोशल मिडिया भावूक झाला, अनेकांच्या डोळे पाणावले, बडे नेतेही धाय मोकलून रडू लागले. आज २२ जुलै रोजी अजित पवारांचा सर्वत्र वाढदिवस साजरा केला जायचा. मात्र, आज त्यांची जयंती साजरी होत असल्याने अनेक नेते भावूक झाले आहेत, अनेक नेत्यांनी दादांच्या आठवणी जागवल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी अजित पवारांची आठवण सांगत आपल्या राजकीय प्रवेशाचे कारण अजित दादा तुम्हीच होतात, असे म्हटले. तर, ज्येष्ठ नेते तथा ठाकरेंच्या शिवसेनेतील बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनीही अजित दादांची उणीव शब्दात व्यक्त करता येणार नसल्याचे म्हटले.

अमोल कोल्हेंनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, आजचा दिवस खरंतर आम्हा सर्व कार्यकर्त्यांसाठी अतिशय उत्साहाचा आणि आनंदाचा दिवस, पण आज आपण आमच्यात नाहीत ही जाणीवच अस्वस्थ करुन टाकते. दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्याच्या दिवशी आज आपल्याला आदरांजली वहावी लागतेय ही भावना वेदनादायी आहे. दादा आपले शिस्तप्रियता, विकासाभिमुख दृष्टिकोन, वक्तशीरपणा आणि आपल्या माणसांबद्दल असलेला आपलेपणा हे स्वभावगुण कायमच मनाला भावले. खरंतर आपल्यामुळेच मी राजकीय क्षेत्रात पाऊल टाकले, अशी आठवण देखील कोल्हेंनी सांगितली. महाराष्ट्रातील माझ्या सर्वात प्रिय नेत्यांपैकी आपण आहात. दरवर्षी वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना अत्यंत आपुलकीचा संवाद व्हायचा, आपलं भरभरून प्रेम मिळायचं. यावर्षी त्या संवादाची, त्या प्रेमाची उणीव प्रकर्षाने भासतेय, अशी पोस्ट खासदार कोल्हे यांनी व्यक्त केली.

दिलीप सोपल यांची भावनिक पोस्ट

अजित पवारांच्या निधनानंतर प्रतिक्रिया देताना भावूक झालेले बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनीही अजित पवारांच्या जयतीनिमित्त त्यांची आठवणी जागवली. दादा, तुमची उणीव शब्दांत व्यक्त करता येणार नाही, असे सोपल यांनी सोशल मीडियातून म्हटले आहे. तर, यापूर्वी अजित पवारांचा उल्लेख करताना सोपल यांनी अजित दादा म्हणजे वेगळे रसायन असल्याचे म्हटले होते. अजित दादा म्हणजे, रंगूनी साऱ्या रंगात रंग माझा वेगळा, गुंतूनी साऱ्या गुंत्यात पाय माझा मोकळा.. असे अजब रसायन असल्याचे सांगत आमदार सोपल यांनी दादांची राजकीय उंची व्यक्त केली होती.

# विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र बंदची हाक

## वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आणि विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ वंचित बहुजन आघाडीने आज गुरुवार, दि. २३ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या बंदचे आवाहन केले असून, समविचारी राजकीय पक्ष, विद्यार्थी, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी बंदला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांकडून सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून झालेल्या लाठीहल्ल्यामुळे देशभरातून संताप व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने संवादातून आणि संवेदनशीलतेने पाहण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि दिल्लीतील कथित पोलिसी दडपशाहीचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

या बंदमध्ये महाराष्ट्रातील विविध घटकांनी सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी एकजूट दाखवावी, असे आवाहन ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. दरम्यान, दिल्लीतील आंदोलनाचे पडसाद महाराष्ट्रातही उमटत असून विविध ठिकाणी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आणि लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने होत आहेत. त्यामुळे आज च्या महाराष्ट्र बंदकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.



## श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला व्ही एस पँथर्स युवा संघटनेचा जाहीर पाठिंबा



### लातूरकरांनी बंद मध्ये सहभागी व्हावे- विनोद खटके

**लातूर/ प्रतिनिधी:** दिल्ली येथील विद्यार्थी आंदोलनावर दिल्ली पोलिसांच्या वतीने अमानुषपणे लाठी हल्ला करण्यात आला याच्या निषेधार्थ श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंद चे आवाहन केले आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन पत्रक काढून जाहीर पाठिंबा दिला. लातूर जिल्ह्यातील सर्व व्यापारी संस्थान ,शैक्षणिक संस्था बंद ठेवून या अमानुष लाठी हल्ल्याचा निषेध नोंदवावा असे आवाहन विनोद खटके यांनी केले आहे.

या बैठकीला प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष ॲड किरण पायाळ, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख, शहराध्यक्ष असद शेख, वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार, कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड, ऑटो युनियन शहरअध्यक्ष जगदीश सरवदे, जिल्हा संघटक गोविंद कांबळे सह आदी पदाधिकारी उपस्थित होते .

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीअंतर्गत बाल रुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच आर्थिक सहाय्य

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. महागड्या निदान चाचण्यांमुळे उपचार प्रक्रियेत होणारा विलंब टाळून कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आणि टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. या विशेष उपक्रमांतर्गत राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांना निदानासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या लाभाअंतर्गत ० ते १८ वयोगटातील पात्र बालरुग्णांना कर्करोगाचे निदान निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक तसेच पुढील खर्चिक वैद्यकीय चाचण्यांसाठी आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. या सहाय्यामुळे आर्थिक अडचणींमुळे निदान प्रक्रियेत होणारा विलंब टाळून वेळेत निदान आणि उपचाराचे प्रभावी नियोजन करणे शक्य होणार आहे.

पहिल्या दोन महिन्यांतच ५९ बालरुग्णांना ५० लाख रूपयांचे आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात आले आहे. या सर्व बालरुग्णांचे कर्करोग निदान टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे करण्यात आले. बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच सुरू करण्यात आलेला हा उपक्रम आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. वेळेत निदान झाल्यामुळे उपचाराला होणारा विलंब कमी होऊन बालरुग्णांना योग्य वेळी उपचार सुरू करण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी अंतर्गत बालरुग्णांच्या कर्करोग निदानासाठी प्रथमच स्वतंत्र आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. हा लाभ राज्यातील २०० आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्करोगग्रस्त बालरुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या २०० लाभार्थ्यांपैकी आतापर्यंत ५९ बालरुग्णांना निदानासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. गरजू रूग्णांनी अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक १८००१२३२२११ वर संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे ६० टक्के उपचार शासकीय रुग्णालयांतच व्हावेत –सार्वजनिक आरोग्य मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत किमान ६० टक्के उपचार शासकीय आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातूनच झाले पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश देत सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले राज्य आरोग्य हमी योजनेचा जास्तीत जास्त निधी शासकीय रुग्णालयांकडे वळविल्यास शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आरोग्य हमी सोसायटीची आढावा बैठक सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव ई. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाचे आयुक्त डॉ. सुनील भोकरे उपस्थित होते. तर राज्यातील सर्व क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयक दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, महात्मा फुले जनआरोग्य योजना ही खाजगी रुग्णालयकेंद्रित नसून जनताकेंद्रित योजना आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांच्या माध्यमातूनच या योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळाला पाहिजे. शासनाच्या आरोग्य योजनांचा अधिकाधिक निधी शासकीय रुग्णालयांकडे वळल्यास आरोग्य विभागाची अंतर्गत यंत्रणा अधिक बळकट होईल. यासाठी क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हा समन्वयकांनी प्रभावीपणे काम करून जिल्हा शल्यचिकित्सक व संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने समन्वय ठेवावा. तसेच शासकीय रुग्णालयांतील क्लेम मंजुरीतील अडचणी तातडीने दूर करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शासकीय आरोग्य संस्थांचे बळकटीकरण यावर विशेष भर देत प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत गुणवत्तापूर्ण व मोफत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी आणि आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य यंत्रणेतील सर्वच घटकांनी संवेदनशीलपणे व समन्वयाने काम करावे, असे आवाहनही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

# जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांची नागपूर विभागीय क्रीडा उपसंचालकपदी पदोन्नती

## लातूरच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या कसगावडे यांचा मान्यवरांकडून सत्कार; लातूरकरांच्या कायम स्मरणात राहणार कार्यकाळ

**लातूर/ प्रतिनिधी:** लातूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांची नागपूर विभागाच्या क्रीडा उपसंचालकपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी अशोक हनवते, संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस म. रा. पत्रकार संघ, लातूर, लातूर शहर महानगरपालिकेचे स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, सेवानिवृत्त कर्मचारी अन्वर शेख तसेच स्वच्छता निरीक्षक मोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन कसगावडे यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

महादेव कसगावडे यांनी लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून आपल्या कार्यकाळात क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. अवघ्या एका वर्षाच्या कालावधीत त्यांनी लातूरच्या क्रीडा क्षेत्राला विकासाची नवी दिशा देत खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

महिला खेळाडू आणि नागरिकांसाठी महिला क्रांतीच्या माध्यमातून ओपन जिमची पडदा लावून सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाला त्यांनी चालना दिली. तसेच कार्यालयीन इमारतीवर ५० किलोवॅट क्षमतेचे सौर पॅनेल बसविण्याचे महत्त्वपूर्ण काम करण्यात आले. क्रीडा सुविधांच्या विकासासाठी ४०० मीटर सिंथेटिक ट्रॅक आणि फुटबॉल मैदानाचे काम सुरू करण्यात आले.

'मिशन लक्षवेध' अंतर्गत विभागीय क्रीडा संकुलात कुस्तीचे विभागीय निपुणता केंद्र सुरू करण्याबरोबरच रायफल शूटिंग, लॉन टेनिस, कुस्ती आदी खेळांसाठी जिल्हा प्रतिभा विकास केंद्र उभारण्याच्या दिशेनेही त्यांनी महत्त्वपूर्ण पावले उचलली. जिल्हा क्रीडा संकुलातील पार्किंग व्यवस्थेत सुधारणा करून खेळाडू आणि नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठीही त्यांनी विशेष लक्ष दिले.

सायकलिंग क्रीडा प्रकारातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दोन खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तयारीसाठी सायकलींचे वितरण करण्यात आले. तसेच लातूरमध्ये विविध खेळांच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करून जिल्ह्यातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

लातूर हा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जात असतानाही जल-तरण या क्रीडा प्रकाराच्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन लातूरमध्ये करण्यात आले. खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच क्रीडा क्षेत्राचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी कसगावडे यांनी घेतलेले निर्णय आणि केलेले प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय ठरले आहेत.

'अधिकारी असावा तर महादेव कसगावडे यांच्यासारखा,' अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. कोणतेही काम हाती घेतल्यानंतर ते पूर्ण करण्याची इच्छाशक्ती, काम करण्याची धमक आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासाची तळमळ त्यांच्या कार्यातून दिसून आली.



त्यामुळे त्यांचा लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणूनचा अल्पकालीन कार्यकाळ असला तरी त्यांनी केलेले काम आणि निर्माण केलेल्या क्रीडा सुविधा लातूरकरांच्या कायम स्मरणात राहतील, असे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले.

दरम्यान, जिल्हा क्रीडा अधिकारी पदाचा पदभार जयराज मुंडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. लातूर जिल्ह्याला महादेव कसगावडे यांच्यासारखे कार्यक्षम, कर्तव्यदक्ष आणि विकासाची दृष्टी असलेले अधिकारी मिळावेत, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

नागपूर विभागाच्या क्रीडा उपसंचालकपदी पदोन्नती झाल्याबद्दल महादेव कसगावडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. लातूरच्या क्रीडा क्षेत्रासाठी त्यांनी दिलेले योगदान आणि एका वर्षात केलेली विकासकामे ही त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाची साक्ष देणारी ठरली आहेत.

## संपादकीय...

### विद्यार्थ्यांचा आवाज दडपणार की ऐकणार? सत्तेला जमिनीवर आणण्याची ताकद लोकशाहीतच!

लोकशाहीमध्ये सरकार कितीही बलाढ्य असो, कितीही मोठे बहुमत असो किंवा सत्ताधारी पक्षाकडे कितीही राजकीय ताकद असो, जनतेच्या प्रश्नांसमोर त्याला कधीतरी उत्तर द्यावेच लागते. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून देशातील राजकीय वातावरण तापले आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिसी कारवाईचा देशभरातून निषेध होत असताना, या घटनेने एक मूलभूत प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहेसरकारने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना संवादातून उत्तर द्यायचे की दडपशाहीच्या मार्गाने? दि. २० जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीहल्ल्यामुळे देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांचा आवाज ऐकून घेणे, त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करणे आणि त्यातून मार्ग काढणे ही कोणत्याही लोकशाही सरकारची जबाबदारी आहे. आंदोलनकर्त्यांवर बळाचा वापर झाला असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होणेही तितकेच आवश्यक आहे. विद्यार्थी हा देशाचा भविष्यकाळ आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा प्रशासक, डॉक्टर, अभियंता, शिक्षक, पत्रकार, शास्त्रज्ञ आणि लोकप्रतिनिधी होणार आहे. अशा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय म्हणून पाहणे ही लोकशाहीची मोठी शोकांतिका ठरू शकते. विद्यार्थ्यांच्या मनात असंतोष निर्माण होण्यामागची कारणे समजून घेणे आणि त्यावर तोडगा काढणे हे सरकारचे कर्तव्य आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ विरोधी पक्षांनीही केंद्र सरकारविरोधात आवाज उठविला आहे. पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ आंदोलन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरोधकांवरही पोलिसांकडून कारवाई करण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला तरी आंदोलन करणाऱ्या प्रत्येकाला कायद्याच्या चौकटीत सन्मानजनक वागणूक मिळणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात गेल्या अनेक वर्षांपासून मजबूत सरकार आहे. या काळात त्यांच्या नेतृत्वाला राजकीय आव्हान देणारे अनेक विरोधक समोर आले; मात्र मोदी सरकारला मोठे राजकीय आव्हान निर्माण करण्यात विरोधकांना अपेक्षित यश मिळाले नाही, अशी राजकीय चर्चा सातत्याने होत आली आहे. परंतु आता विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या सरकारसमोर वेगळाच प्रश्न उभा केला आहे. हा प्रश्न निवडणुकीच्या राजकारणाचा नाही; हा प्रश्न तरुणाईच्या भविष्याचा आहे. विद्यार्थ्यांना जर आपल्या भवितव्याबद्दल चिंता वाटत असेल, रोजगाराबद्दल प्रश्न पडत असतील, शिक्षणाच्या संधींबाबत असुरक्षितता निर्माण होत असेल किंवा आपल्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचत नसतील, तर त्यांचा आवाज ऐकणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा आवाज लाठीने थांबवता येत नाही. तो आवाज संवादानेच शांत होतो. आज देशातील तरुणाई सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली भूमिका मांडते, रस्त्यावर उतरते आणि लोकशाही मार्गाने आपल्या मागण्यांसाठी संघर्ष करते. त्यामुळे कोणतेही सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. विद्यार्थ्यांनी सरकारला टक्कर दिली, असा राजकीय अर्थ काढण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी सरकारला प्रश्न विचारले, हा लोकशाहीचा विजय आहे, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. सत्तेची खरी परीक्षा विरोधकांना दाबण्यात नसते; तर विरोधकांचे, विद्यार्थ्यांचे आणि सामान्य जनतेचे प्रश्न ऐकून घेण्यात असते. सरकारला जमिनीवर आणण्याची ताकद कोणत्याही एका व्यक्तीमध्ये नसते; ती ताकद जनतेच्या एकजुटीत आणि लोकशाहीच्या संस्थांमध्ये असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे सरकारने राजकीय आव्हान म्हणून न पाहता सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. आज विद्यार्थी रस्त्यावर आहेत, विरोधक आंदोलन करत आहेत आणि देशभरातून प्रश्न विचारले जात आहेत. या सर्व घटनांकडे सरकारने गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. सत्ता कायमची नसते; परंतु लोकशाही मूल्ये कायमची असतात. म्हणूनच सरकारने विद्यार्थ्यांशी संवाद साधावा, त्यांच्या मागण्यांवर खुलेपणाने चर्चा करावी आणि आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिसी कारवाईबाबत वस्तुनिष्ठ चौकशी करावी. देशाच्या तरुणाईचा आवाज ऐकला गेला, तरच भारताचा लोकशाही प्रवास अधिक मजबूत होईल. कारण विद्यार्थ्यांचा आवाज दडपून सत्ता मजबूत होत नाही; उलट संवादातूनच लोकशाही अधिक भक्कम होते. आजचा विद्यार्थी केवळ वर्गात बसणारा विद्यार्थी राहिलेला नाही. तो आपल्या हक्कांसाठी प्रश्न विचारतो, अन्यायाविरोधात उभा राहतो आणि सत्तेला जाब विचारतो. हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. त्यामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या या आवाजाला विरोध म्हणून नव्हे, तर भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेला इशारा म्हणून स्वीकारण्याची गरज आहे.

## कामगार विभागाकडून 'सेवा हमी कायद्या'चे सर्रास उल्लंघन: महामंडळातील घोटाळे आणि जाचक अटीविरोधात जनवादी बांधकाम कामगार मजदूर संघटनेचा एल्गार

**यवतमाळ/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा मनमानी कारभार, कोट्यवधी रुपयांची लूट आणि कामगार विरोधी धोरणांमुळे राज्यातील लाखो बांधकाम मजूर हवालदिल झाले आहेत. कामगारांच्या हक्काचे पैसे कंत्राटदारांच्या घशात घालण्याचे आणि कायदेशीर हक्क नाकारण्याचे कामगार विभागाचे षड्यंत्र सुरू असून, याविरोधात 'जनवादी बांधकाम कामगार मजदूर संघटना' तीव्र जनआंदोलन छेडण्याच्या तयारीत आहे. असा इशारा संघटनेचे अध्यक्ष श्री रत्नपाल गोवर्धन डोफे, उपाध्यक्ष वंदना म्हैसकर, सचिव श्री सम्येक म्हैसकर, कोषाध्यक्ष सुजाता डोफे. कार्यालय प्रमुख कु. कल्याणी डोफे, यांनी दिला आहे.

या संदर्भात जिल्हा सरकारी कामगार अधिकारी कार्यालय यवतमाळ येथे अधिकृत तक्रार निवेदन सादर करण्यात आले होते. संघटनेच्या निवेदनाची गांभीर्य लक्षात घेऊन यवतमाळच्या उप जिल्हा उप कार्यकारी अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकाऱ्यांनी जावक क्रमांकः जा.क्र. मइवइबांकामं/यवत/३५३/२०२६ अन्वये हे पत्र पुढील तात्काळ मुख्य कारवाईसाठी थेट मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई यांच्याकडे सविनय सादर केले आहे. संघटनेने उपस्थित केलेले मुख्य मुद्दे आणि मागण्या खालीलप्रमाणे आहेतः.

१) २१ प्रकारच्या शैक्षणिक योजना पूर्ववत सुरू कराः महामंडळाने अतिशय अन्यायकारक निर्णय घेऊन पहिली ते नववी, ११ वी, डिप्लोमा आणि पदवी अभ्यासक्रमाचे लाभ बंद केले आहेत. शासन परिपत्रकानुसार निश्चित केलेल्या २१ प्रकारच्या शैक्षणिक व आर्थिक मदत योजना पात्र नोंदणीकृत कामगारांच्या मुलांसाठी तात्काळ आणि पूर्ववत सुरू करण्यात याव्यात. २) सेवा हमी कायद्याचे सर्रास उल्लंघनः सन २०१५ च्या सेवा हमी कायद्यानुसार, कामगारांच्या लाभाच्या योजनांचे अर्ज हे २ महिने म्हणजेच ६० दिवसांच्या आत मंजूर करणे बंधनकारक आहे. तसेच नवीन नोंदणी (Registration) आणि नूतनीकरण (Renewal) चे अर्ज ३ महिने म्हणजेच ९० दिवसांच्या आत निकाली काढणे बंधनकारक आहे. असे असतानाही, कामगार विभागात ३-३ महिन्यांपेक्षा जास्त काळ उलटूनही कोणत्याही प्रकारचे अर्ज निकाली काढण्यात आलेले नाहीत. हा थेट सेवा हमी कायद्याचा अवमान आणि कामगारांची क्रूर थट्टा आहे. ३) बेकायदेशीर ठझङ ट्रेनिंगच्या नावाखाली अतोनात लूटः कल्याणकारी महामंडळात सध्या बेकायदेशीरपणे RPL (Recognition of Prior Learning) ट्रेनिंगच्या नावाखाली कामगारांच्या नावावर अतोनात निधी लाटला जात आहे. प्रत्यक्षात कामगारांना कोणतेही दर्जेदार प्रशिक्षण न देता, केवळ कागदोपत्री आर्थिक घोटाळे केले जात आहेत. कंत्राटदारांचे भले करणारा हा भ्रष्टाचार तात्काळ बंद झाला पाहिजे. ४) सैनिक लाभ योजनेतील तफावतः महाराष्ट्रात अधिकृतपणे सैनिकी शाळा केवळ दोनच असताना, इतर शाळांमधील विद्यार्थ्यांना देखील चुकीच्या पद्धतीने सैनिक लाभ वितरित केले जात असल्याचा संशय आहे. याची सखोल चौकशी झाली पाहिजे. याउलट, सर्वसामान्य मजुरांच्या पाल्यांची पहिली ते नववी, ११ वी, डिप्लोमा व पदवी अभ्यासक्रमाची कायदेशीर शैक्षणिक मदत मात्र शासनाने बंद केली आहे. जी तात्काळ पूर्ववत सुरू झाली पाहिजे. ५) प्रसूती आणि मृत्यू लाभ योजनेतील जाचक अटी रद्द कराः प्रसूती लाभः नवीन नियमानुसार प्रसूतीचा २५,००० रुपये लाभ केवळ नोंदणीकृत महिला कामगारालाच देण्याचा अन्यायकारक निर्णय रद्द करून, पूर्वीप्रमाणेच कुटुंबातील पुरुषाची नोंदणी असली तरीही त्याच्या पत्नीला हा लाभ मिळाला पाहिजे,मृत्यू लाभ (विमा): कामगाराचा मृत्यू झाल्यास वारसाला लाभ मिळण्यासाठी लादलेली ३ वर्षांच्या निरंतर नोंदणीची जाचक अट रद्द करून, मूळ कामगाराची नोंदणी जीवित (Active) असल्यास वारसाला सरळ लाभ मिळाला पाहिजे, ६) पेन्शन योजनेचे अटी शिथिल करा- पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी मंडळाकडे किमान ५ ते जास्तीत जास्त १० वर्षे नोंदणी असलेल्या प्रत्येक व्यक्तीला पेन्शन योजनेची अट ठेवून लाभ देण्यात यावा. ७) भ्रष्ट ३५८ तालुका सुविधा केंद्रे (BWFC) आणि बोगस तपासणी बंद कराः राज्यातील ३५८ तालुका सुविधा केंद्रे ही कोणत्याही कायदेशीर तरतुदीशिवाय केवळ भ्रष्टाचार आणि दलालांची पाठराखण करण्यासाठी सुरू केली आहेत, ती तात्काळ बंद व्हावीत. तसेच आरोग्याच्या नावाखाली प्रति कामगार ३९०० रुपयांची होणारी बेकायदेशीर बोगस तपासणी व साहित्य वाटप (भांडी. पेटी, आर ओ) तात्काळ बंद करून तो निधी कामगारांच्या थेट खात्यात वर्ग करण्यात यावा कामगार विभागाचा हा मनमानी कारभार आणि भ्रष्टाचार थांबला नाही, तर जनवादी बांधकाम कामगार मजदूर संघटना संपूर्ण जिल्ह्यात कामगारांना सोबत घेऊन तीव्र रस्त्यावरील संघर्ष आणि आंदोलन करेल, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे.

श्री.रत्नपाल गोवर्धन डोफे यवतमाळ




## महान क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद

भारताच्या स्वतंत्र संग्रामामध्ये अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली व आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले.यामध्ये प्रामुख्याने क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांचे नाव मोठ्या अभिमानाने आजही घेतले जाते.त्याचप्रमाणे अल्पवयात देशासाठी लढा उभारणारे महान क्रांतिकारक म्हणून चंद्रशेखर आझाद यांची ख्याती आहे.चंद्रशेखर आझाद यांचा जन्म २३ जुलै १९०६ ला मध्यप्रदेशातील झाबुआ(अलिराजपूर)जिल्ह्यातील भावरा या गावी झाला.जन्मताच त्यांच्या हृदयात क्रांतिची जोत लखलखत होती.त्यांचे प्राथमिक शिक्षण भावरा या गावात झाले.

परंतु आईच्या इच्छेनुसार ते वाराणसी येथील संस्कृत पाठशाळेत शिकत असताना सुद्धा त्यांच्यात क्रांतीची ज्वाला धकधकत होती.चंद्रशेखर आझाद यांचे बालपण भिल्ल जमातीच्या वस्तीत गेले त्यामुळे ते धनुष्य बाण उत्तम रीतीने चालवत म्हणजेच त्यांच्यात बालपणापासून लढवय्य व क्रांतिकारक वृत्ती होती. १३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड घटनेचा चंद्रशेखर आझाद यांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला व तळपायाची आग मस्तकात गेली.त्यानंतर चंद्रशेखर आझाद १९२० मध्ये महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील असहकार चळवळीचा एक भाग बनले आणि वयाच्या १५ व्या वर्षी त्यांना अटकही झाली.अशा परिस्थितीत ब्रिटन न्यायालयाने या छोट्याशा मुलाला १२ फटक्यांची अमानुष शिक्षा दिली.चंद्रशेखर आझाद यांचे मुळ नाव चंद्रशेखर सीताराम तिवारी होते.

परंतु बालवयातील अमानुष शिक्षा पहाता ब्रिटिश न्यायालयात नाव नोंदविताना आपले आडनाव आझाद असल्याचे नोंदविले.तेव्हापासुन संपूर्ण हिंदुस्थानात चंद्रशेखर आझाद नावाने ओळखले जाऊ लागले.फटक्यांनी आझादांच्या मनात क्षोभ वाढुन तळपायाची आग मस्तकात गेली आणि त्याच क्षणी त्यांचा अहिंसेवरील विश्वास उडाला व क्रांतीची ज्वाला प्रगट झाली आणि क्रांतिकारक झाले.आझाद यांचा क्रांतीकारी



हेतू पहाता १९२२ साली महात्मा गांधीनी आझाद यांना असहकार चळवळीतून काढून टाकले. त्याचे आझाद यांना खुप वाईट वाटले. अशा परिस्थितीत त्यांनी गुलामगिरीत असलेल्या भारताला स्वातंत्र्य करण्याची शपथ घेतली.

पुढे त्यांची भेट हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनचे संस्थापक राम प्रसाद बिस्मिल यांच्याशी झाली व क्रांतीची ज्योत आणखी प्रज्वलित झाली.क्रांतीची ज्वाला संपूर्ण भारतात पसरविण्याच्या दृष्टीने मातृभूमीच्या रक्षणार्थ अनेकांना आंदोलनात सहभागी होण्यास प्रेरित केले.इंग्रजांना आर्थिक दृष्ट्या कमजोर करण्याच्या हेतूने व क्रांतिकारकांची भिती इंग्रजांमध्ये निर्माण व्हावी या उद्देशाने आझाद यांनी आपल्या बळावर काकोरी ट्रेन लुटली आणि व्हाइसरॉयच्या ट्रेनला उडविण्याचा देखील प्रयत्न केला.इंग्रजांच्या असेम्ब्लीत बॉम्ब फोडण्याच्या घटनेत चंद्रशेखर आझाद यांनी भगतसिंग यांना पुरेपूर मदत केली.

चंद्रशेखर आझाद हे भगतसिंग यांचे मुख्य सल्लागार होते.भगतसिंग यांना अटक झाल्यानंतर त्यांना सोडविण्यासाठी देखील आझाद यांनी भरपूर प्रयत्न केलेत. अशा परिस्थितीत इंग्रजांना नेहमी प्रमाणे चकमा देतच होते. दिनांक २७ फेब्रुवारी १९३१ रोजी अलाहाबाद मधील अल्फ्रेड पार्क येथे राजगुरू हे जेलमध्ये असतांना त्यांच्या आईला आर्थिक मदत व्हावी यासाठी ते एका क्रांतिकारक सहकाऱ्याला भेटण्यासाठी गेले असता, एका अज्ञात खबऱ्याने इंग्रजांना चंद्रशेखर आझाद असल्याची वार्ता दिली आणि मोठा घात झाला. इंग्रजांना वार्ता मिळताच मैदानाला वेढा घातला. अशा परिस्थितीत चंद्रशेखर आझाद व इंग्रज सैन्य यांच्यात मोठा गोळीबार झाला.अशावेळी आझाद यांनी तीन इंग्रजांना धाराशाही केले.


आपल्या जवळच्या गोळ्या संपत आहे हे त्यांच्या लक्षात आले.अशा परिस्थितीत त्यांना इंग्रजांच्या हातुन मरने पसंत नव्हते शेवटच्या गोळीने स्वतःला मारून घेतले आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी शहीद झाले.भारत स्वतंत्र होण्यासाठी ज्यांनी कशाचीही पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली अशांमध्ये आघाडीवर घेतले जाणारे नाव म्हणजे क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अनेक ज्ञात/अज्ञात क्रांतिकारकांनी अल्पवयात आपल्या प्राणांची आहुती दिली व देश स्वतंत्र झाला.त्यामुळे त्यांच्या बलिदानाची पावती आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी देणे गरजेचे आहे.

देशातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की देश स्वतंत्र करण्यासाठी क्रांतिकारकांनी घरदार सोडून, घरांवर तुळशीपत्र ठेवून,आपला परिवार सोडून आणि आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांची पुर्तता करण्याचे काम आज राजकीय पुढाऱ्यांचे आहे.कारण देशातील जनता सुखी- समृध्दी आणि समाधानी रहावी म्हणून देश स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी लढा उभारला होता.

आता देश स्वतंत्र झाला आहे तरी देशात बेरोजगारी, भुकमरी,महागडे शिक्षण,भ्रष्टाचार, पेपर फुटी,रोजगार या सर्वांचा सामना गरीब व सर्वसामान्यांना आणि विद्यार्थ्यांना करावा लागतो आहे.आज १४५ करोड लोकसंख्येच्या देशात करोडोंची संपत्ती आहे यात दुमत नाही. परंतु मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी (आजी-माजी आमदार - खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी) देशांच्या करोडोंच्या संपत्तीवर आपली पकड मजबूत करून ठेवली आहे.यामुळे हा पैसा १४५ कोटी जनतेपर्यंत पोहचत नाही.यामुळे आर्थिक उलाढाल खोळंबत आहे व यातुनच देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्माण होतांना दिसतात व याचा फटका सरळ सर्वसामान्य, शेतकरी व गरीब लोकांना भोगावा लागत आहे.

त्यामुळे दिवसेंदिवस गरीब हा गरीब होत आहे तर श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना माझी विनंती आहे की क्रांतिकारकांनी आपले बलिदान दिले,आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले त्याचा फायदा शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना व्हावा या उद्देशाने कार्य केले पाहिजे. त्याचबरोबर राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करून देशाच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी हातभार लावला पाहिजे.

तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांकडुन क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.त्याचप्रमाणे देशात वाढते प्रदुषण पहाता क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवेत. यामुळे संपूर्ण देशात वातावरण प्रफुल्लित राहील व ऑक्सिजनची मात्रा वाढेल आणि मुख्यत्वेकरून या दिवशी केलेले वृक्षारोपण अनंत काळापर्यंत आपल्याला ग्यात राहिल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व मुळांमध्ये आपल्याला क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांची क्रांतीची ज्वाला धकधकतांना दिसेल. क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांना कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!



लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**

(स्वतंत्र पत्रकार )

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## लोकशाहीची हत्या कि नसबंदी?

विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी प्रसिद्ध पर्यावरणवादी, सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सोनम वांगचुक सध्या देशाची राजधानी दिल्ली येथील ऐतिहासिक जंतर-मंतर मैदानावर उपोषणाला बसले आहेत.ते विद्यार्थ्यांसाठी दिल्लीत न्याय मागत आहेत, पण सरकारकडून होणारे कमालीचे दुर्लक्ष हा सध्याच्या राजकीय व्यवस्थेचा सर्वात मोठा आणि धक्कादायक आरसा आहे. दुर्दैव असे की, देशाच्या नाकाखाली दिल्ली येथे सुरू असलेल्या या आंदोलनाची साधी दखल घ्यायलाही सरकार तयार नाही. सोनम वांगचुक यांच्या या आंदोलनाकडे सरकार ज्या निगरगट्ट भावनेने पाहत आहे, त्यावरूनच सत्ताधा-यांचा गेल्या १५ वर्षांतील कारभाराचा एक अतिशय भयंकर आणि पद्धतशीर अजेंडा उघडपणे समोर येतो. हा अजेंडा म्हणजे जनतेच्या अक्रोशाला, आंदोलनांना आणि प्रामाणिक मागण्यांना पूर्णपणे निकालात काढणे. लोकशाहीमध्ये धरणे, मोर्चे, आंदोलने, निदर्शने आणि उपोषणे या गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व असते; कारण हा सामान्य माणसाच्या न्यायाचा शेवटचा



मार्ग असतो. परंतु, या सरकारने या सर्व लोकशाही मार्गांना अजिबात दाद द्यायची नाही, त्यांची दखल घ्यायची नाही आणि त्यांना काडीचेही महत्त्व द्यायचे नाही, अशी एक अघोषित रणनीतीच आखली आहे. सरकार कितीही बदनाम झाले, देशात किंवा राज्यात कितीही अडचणी निर्माण झाल्या, अगदी सरकारचे मंत्री आणि मोठे अधिकारी गंभीर प्रकरणात अडकले, तरी कोणाचाही राजीनामा घ्यायचा नाही, कोणालाही पदावरून दूर करायचे नाही आणि स्वतःवर नामुष्की ओढवून घ्यायची नाही, हाच एकमेव हट्टी अजेंडा सध्या राबविला जात आहे. पूर्वीच्या काळातील राजकीय नैतिकता आणि संवेदनशीलता आता पूर्णपणे संपली असून, त्याची जागा सत्तेच्या अहंकारातून आलेल्या मग्रुरीने घेतली आहे. या नियोजनबद्ध दुर्लक्षामुळे आज समाजात एक अत्यंत घातक बदल घडत आहे. आंदोलने करूनही सरकार ढिम्म हलत नसल्याचे पाहून लोकांचा धरणे, मोर्चे आणि उपोषणांवरचा विश्वासच हळूहळू उडू लागला आहे. सामाजिक चळवळींची ही धारदार हत्यारे निष्प्रभ करणे, त्यांची धार घालवून टाकणे आणि त्यांचे महत्त्व पूर्णपणे संपवून टाकणे, हाच यामागील सुप्त हेतू आहे. जनता कितीही विरोधात गेली तरी तिच्या मताला आणि भावनांना कवडीचीही किंमत द्यायची नाही, लोकांनी कितीही विरोध केला तरी त्यांना अजिबात जुमानायचे नाही आणि शेवटी ईडी, सीबीआय, पोलीस दल किंवा सैन्य दलाचा वापर करून सर्व आंदोलने व निदर्शने मोडून काढायची, हाच या सरकारचा मार्ग बनला आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी व्यक्ती सोनम वांगचुक यांच्यासारखी समाजात कितीही आदराचे स्थान असणारी असो किंवा तिचे कर्तृत्व कितीही मोठे असो, अशा व्यक्तीला मान द्यायाचा नाही आणि तिच्या मागण्यांना भीक घालायची नाही, हाच पॅटर्न सतत राबवला जात आहे. जर नागरिकांच्या मनात ही भावना अशीच सतत निर्माण होत राहिली, तर भविष्यात लोकशाहीचा श्वासच गुदमरेल. लोकांना वाटू लागेल की रस्त्यावर उतरून आणि संघर्ष करून काहीच साध्य होत नाही, ज्यामुळे पुढे कोणीही अन्यायाविरुद्ध मोर्चे काढायला किंवा उपोषणाला बसणारच नाही. ज्या दिवशी देशातील जनता हताश होऊन रस्त्यावर उतरणे बंद करेल, त्याच दिवशी लोकशाहीचा अधिकृत हत्या होईल आणि एका मूक, लाचार समाजाची निर्मिती होईल.

म्हणूनच, सोनम वांगचुक यांच्या निमित्ताने दिल्लीच्या जंतर-मंतरवरून समोर आलेल्या, आंदोलनांची धार बोथट करणाऱ्या या भयानक अजेंड्याविरोधात वेळीच सावध होऊन आपला आवाज अधिक बुलंद करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.



**लेखन - पत्रकार महेंद्र सोनावणे**

**९८२२२५०४९३ (जादूगार एस.महेंद्रा)**

# उपवर्गीकरणाच्या विरोधात केज येथे धरणे आंदोलन नियोजन बैठक संपन्न

**केज/प्रतिनिधी :** अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात केज येथे २७ जुलै २०२६ रोजी निदर्शने करण्यात येणार आहेत. त्या संदर्भात शासकीय विश्रामगृह या ठिकाणी रिपाइंचे तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांनी बैठक आयोजित केली होती.

रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना. रामदासजी आठवले यांच्या आदेशाने व मार्गदर्शक युवा प्रदेश अध्यक्ष तथा बीड जिल्हा अध्यक्ष पप्पु कागदे आणि केज तालुका रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने राजकीय हेतू साध्य करण्यासाठी व अनुसूचित जातीच्या समुहामध्ये फुट पाडून जाती जातीत तेढ निर्माण करण्यासाठी असंविधानिक मार्गाने अनुसूचित जातीतील इतर जातीचा विचार न करता हेतूपुरस्पर ५९ जाती पैकी एका विशिष्ट अनुसूचित जातीच्या समाजाला हाताशी धरुन अ, ब, क, ड अनुसूचितजाती उपवर्गीकरण करण्याचा घाट घातलेला आहे. हे शासनाचे धोरण समाज विघातक असून असंविधानिक, लोकशाहीस विघातक स्वरुपाचे आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या समाज विघातक लोकशाही निर्णया विरोधात दि. २७ जुलै वार सोमवार रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता केज येथील तहसील कार्यालय समोर रिपब्लीक पार्टी ऑफ इंडीया केजच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

तसेच या अंदोलनामध्ये पुढील मागण्यांचा समावेश राहाणार आहे. अनुसूचितजाती अ, ब, क, ड उपवर्गीकरण च्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने घेतलेला निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. तसेच उपवर्गीकरण च्या अनुषंगाने सोशल मीडियावर भडकावू आणि जातीय तेढ निर्माण करणारे यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. त्या संदर्भात दि.२२ जुलै रोजी केज येथील शासकीय विश्राम गृहावर बैठक संपन्न झाली. या बैठकीला तालुकाध्यक्ष दिपक कांबळे, जिल्हा संघटक रविंद्र जोगदंड, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे, तालुका उपाध्यक्ष प्रशांत हजारे, आय टी सेलचे अध्यक्ष सुरज काळे, युवा तालुका सरचिटणीस हरेंद्र तुपारे, युवक तालुका उपाध्यक्ष विनोद गायकवाड, येवता सर्कल प्रमुख हरीष गायकवाड, राहुल काळे, संतोष कोकाटे, शरद धीवर, चंद्रकांत गलांडे, सुनील धीवर, उत्कर्ष काळे, विनोद काळे, लखन गायकवाड, त्रिभुवन दुनघव, रितेश हजारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. या मागण्यांचे आणि आंदोलनाचे निवेदन केज तहसीलचे नायब तहसीलदार सांगे यांना देण्यात आले आहे.



## हजारे दांपत्यांचा मानवतेसाठी मरणोत्तर देहदानाचा संकल्प!; पती पत्नीने वाढदिवासानिमित्त घेतला देहदानाचा ऐतिहासिक निर्णय




**केज/प्रतिनिधी :** काही लोक वाढदिवसा दिवशी केक कापतात मात्र हजारे दांपत्याने वाढदिवसाचे औचित्य साधून मानवतेसाठी देहदानाचा संकल्प करत समाजासाठी मोठी प्रेरणा निर्माण केली आहे.

केज शहरातील लक्ष्मण भारत हजारे व शिला लक्ष्मण हजारे या पती पत्नीने पती लक्ष्मण हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त देह दानाचा संकल्प केला आहे.मानवतेसाठी,सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी मरणोत्तर आपला देह कोणाच्यातरी कामी यावा. या उद्देशाने दोघांनीही देहदानाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

देहदान केलेल्या शरीराचा उपयोग स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळेत प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या शरीर शास्त्र संशोधनासाठी होतो. शरीरातील अवयवांचे प्रत्यारोपण केल्याने त्याचा दुसऱ्यांना उपयोग होतो.लक्ष्मण हजारे यांनी महिला सक्षमीकरण,समुपदेशन,अनाथ वंचित दुर्लक्षिताना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करत सामाजिक प्रबोधनाचे काम केले आहे. हजारे दांपत्याने वाढदिवसानिमित्त देहदानाचा संकल्प करत अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यात प्रतिज्ञापत्र सादर केले.

यावेळी वैद्यकीय महाविद्यालयाचे शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुख डॉ. नीलिमा पाटील उपस्थित होत्या.

## ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशनचा पुढाकार ; वरपगाव जि.प.प्रा.शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल कीटचे वाटप



**केज/प्रतिनिधी :** अंबाजोगाई येथील ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशन व सेवा सहयोग फाउंडेशन पुणे यांच्या वतीने केज तालुक्यातील वरपगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक हात मदतीचा या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना स्कूल कीटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रजाक भाई पठाण प्रमुख पाहुणे तलाठी बालाजी इंगळे, सरपंच अमृता आकाश कांबळे ,वाल्मीक बापू कांबळे, पोलीस पाटील अरुण गालफाडे, केंद्रप्रमुख संतोष नखाते,मुख्याध्यापक यु. डी.पाटील उपस्थित होते. यावेळी ग्राम शक्ती वेल्फेअर फाउंडेशन अंबाजोगाई चे युवा प्रशिक्षणार्थी आर्यन अरविंद शिंदे, तन्मय मोहिते, गोविंद एकशिंगे, किशन घुले,शामल बनसोडे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना किट उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले, फाउंडेशन कडून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केलेल्या सहकार्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व सहशिक्षकांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन,आभार अभिजीत शिंदे यांनी केले.

## भारतीय शास्त्रीय संगीताच्या साधनेतून आत्मानंद मिळतो : तालमणी डॉ.राम बोरगावकर



**लातूर/ प्रतिनिधी:** भारतीय संगीत कलेची साधना केल्याने मनाला शांतता मिळते. सर्वच कलावंत नाही झाले तरी कलेच्या साधनेतून एखादा उत्तम कानसेन, देशाचा उत्तम नागरिक बनू शकतो. कला संस्कृतीची जोपासना केल्याने समाजामध्ये एकात्मता,शांतता नांदते. त्यामुळे प्रत्येकाने भारतीय शास्त्रीय संगीताची साधना करावी त्यातूनच खरा आत्मानंद मिळतो. असे प्रतिपादन ज्येष्ठ तबलावादक तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनी केले.

ते ''कला संस्कृती संगीत संचालनालय, गोवा'' यांच्या वतीने रवींद्र भवन, गोवा या ठिकाणी आयोजित संगीत साधक व कलाकाराच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी पुढे बोलताना तालमणी डॉ. राम बोरगावकर म्हणाले की, सर्व गोमंतकीय कलावंतांसाठी गोवा ही पुण्यभूमी आहे. या पवित्र भूमीने मास्टर दिनानाथ मंगेशकर, प्रभाकर कालेलकर, गानकोकिळा लता दीदी, स्वरसम्राज्ञी किशोरी अमोणकर, पद्मश्री जितेंद्र अभिषेकी, यासारखे अनेक महान कलावंत याच भूमीत जन्मले. गोवा या पवित्र भूमीचे नाव यांच्यामुळे जगभरात झाले. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सर्वांनी संगीत सेवेतून समाजाला आनंद द्यावा असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमात गोवा राज्य सांस्कृतिक पुरस्कार विजेते कलावंत श्री. रामचंद्र नाईक यांचा शासनाच्या वतीने राज्य सांस्कृतिक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी, मराठवाडा संगीत कला अकादमीच्या वतीने अकादमीचे अध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर यांनीही राज्य सांस्कृतिक पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री. रामचंद्र नाईक यांचा हृद्यसत्कार केला. याप्रसंगी रवींद्र नाट्यमंदिराचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## ग्राहक बनून आलेल्या ३ महिलांनी सोन्याच्या ४ गंठणचा बॉक्स पळवीला; ६ लाखाच्या दागिन्याची चोरी




**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील सराफा लाईन मधील हनुमान ज्वेलर्स मध्ये सोने खरेदी करण्यासाठी ग्राहक बनून आलेल्या ३ बुरखाधारी महिलांनी ६ लाख रुपये किंमतीच्या ४७ ग्रॅम सोन्याच्या चार गंठणचा बॉक्स मोठ्या शिताफिने लंपास केल्याचे सिसिटीव्ही फुटेजवरून २० दिवसा नंतर उघड झाल्या नंतर केजचे सुवर्णकार प्रदीप विजयकुमार रुद्रवार यांच्या फिर्यादी वरून मंगळवारी दि. २१ रात्री ८-०० वाजता३ अज्ञात महिलांच्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

दि. १ जुलै रोजी दुपारी १-३० ते ३-०० वाजण्याच्या दरम्यान केज येथील सराफा लाईन येथील श्री. हनुमान ज्वेलर्स या दुकानातुन प्रति ग्रॅम १२ हजार ७६५ रुपया प्रमाणे ५ लाख ९९ हजार ९५५ रुपये किंमतीचे ४७ ग्रॅम सोन्याचे ४ गंठण आसलेल्या दागिन्याचा बॉक्स अज्ञात ३ बुरखाधारी महिलांनी मोठ्या शिताफिने चोरून नेल्या प्रकरणी सुवर्णकार प्रदीप विजयकुमार रुद्रवार, रा.उमरी रोड, केज यांच्या फिर्यादीवरून मंगळवारी रात्री आठ वाजता अज्ञात तीन बुरखाधारी महिलांविरुद्ध केज पोलिसात सोन्याच्या दागिन्याचा बॉक्स चोरून नेल्या प्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे.

### २० दिवसांनी दिली फिर्याद...

ज्या वेळेस चोरी केली त्यावेळेस आमच्या हे लक्षात आले नाही. १५ जुलै रोजी शिल्लक राहिलेल्या सोन्याच्या दागिन्याच्या स्टॉकचे मोजमाप करताना, ४ गंठण कमी भरल्यामुळे मागील तारखेचे तारीख निहाय सर्व सिसिटीव्ही फुटेज चेक केले आसता १ जुलै रोजी ३ बुरखाधारी महिलांनी ४ गंठणचा बॉक्स मोठ्या शिताफिने लंपास केल्याचे सिडिटीव्ही फुटेज वरून निदर्शसनास आल्यामुळे फिर्याद देण्यासाठी २० दिवसाचा उशीर झाल्याची माहिती फिर्यादी सुवर्णकार विजयकुमार प्रदीप रुद्रवार यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील ब्रिज कोर्सला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/ प्रतिनिधी:** दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर येथील संगणकशास्त्र विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ब्रिज कोर्स उपक्रमाची अंतिम परीक्षा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. नव्याने महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची ओळख करून देणे, त्यांच्या मूलभूत ज्ञानाचा पाया भक्कम करणे तसेच नियमित अभ्यासक्रमासाठी सक्षम बनविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.दि.०६ जुलै १५ जुलै या दरम्यान ब्रीज कोर्स घेतला.

सदरील ब्रिज कोर्स अंतर्गत विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर फंडामेंटल्स, प्रोग्रामिंगची मूलतत्त्वे, इंटरनेट व डिजिटल साक्षरता, वेब टेक्नॉलॉजी, मायक्रोसॉफ्ट ऑफिस, कृत्रिम बुद्धिमत्ता () व डेटा सायन्स तसेच प्रोफेशनल स्किल्स या विषयांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करण्यात आले.आज घेण्यात आलेल्या अंतिम परीक्षेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहून परीक्षेत सहभाग नोंदविला.महाविद्यालय प्रशासनाच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे परीक्षा शांततापूर्ण व सुरळीत वातावरणात पार पडली.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ.आर.बी. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण उपक्रमाचे यशस्वी नियोजन करण्यात आले.तसेच बी.सी.एस. अभ्यासक्रम समन्वयक डॉ. एस.ए.जाजू यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.ब्रिज कोर्स कार्यक्रम समन्वयक प्रा.डी.आर.धुमाळ व प्रा.आर.जी.चिलमे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे प्रभावी आयोजन करण्यात आले.

या ब्रिज कोर्समध्ये प्रा.डी.आर. दाडगे, प्रा.ए. एम. बोराडे, प्रा. व्ही. ए. पवार, प्रा. एस. एम. शिंदे, प्रा. एस. एस. पठाण, प्रा. पी. एल. घाटे, प्रा. ए. टी. बनाटे आणि प्रा. व्ही. एम. ताडमाडगे यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी आवश्यक असलेले मूलभूत ज्ञान आत्मसात करण्यास मोठी मदत झाली.

ब्रिज कोर्सच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास, तांत्रिक व शैक्षणिक पाया अधिक भक्कम होण्यास तसेच नियमित अभ्यासक्रमाची सुरुवात अधिक आत्मविश्वासाने करण्यास या उपक्रमाचा निश्चितच लाभ होणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

## बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षांच्या मुलीचा मृत्यू

**शिरूर/प्रतिनिधी :** शिरूर तालुक्यातील पिंपळसुटी येथे बुधवारी पहाटे बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भाग्यश्री संदीप वारे (वय ५, मूळ रा. करोडी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर; सध्या रा. पिंपळसुटी, ता. शिरूर) असे मृत्युमुखी पडलेल्या मुलीचे नाव आहे. याबाबतची फिर्याद तिचे काका बाबासाहेब कोंडीबा वारे यांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाग्यश्री ही कुटुंबीयांसह मच्छिंद्र प्रल्हाद भोसले यांच्या गोठ्यात झोपली होती. बुधवारी पहाटे बिबट्याने गोठ्यात घुसून भाग्यश्रीला उचलून नेले. कुटुंबीयांनी आरडाओरडा केली. मात्र, बिबट्याने मुलीला जवळील उसाच्या शेतात नेले. त्यानंतर गावातील नागरिक, वन विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थांनी तातडीने शोधमोहीम राबवली. काही वेळाने भाग्यश्री जखमी अवस्थेत आढळून आली. तिला तातडीने न्हावरे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करीत आहेत.

दरम्यान, या घटनेनंतर पिंपळसुटी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी वनविभागाकडे केली आहे.

घटनास्थळी वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी प्रशांत खडे, स्मिता राजहंस व तालुका वनाधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी भेट दिली.

**ड्रोनने होणार पाहणी**

'यापूर्वी या परिसरात पिंजरे लावण्यात आलेले होते. पुन्हा नव्याने ६ पिंजरे लावण्यात येणार आहेत. परिसराची ड्रोनने पाहणी करण्यात येणार असून गस्त ही वाढविण्यात आली आहे . बिबट्याला जेरबंद करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे ,' असे तालुका वनाधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

# माजलगाव-धारूर मार्गावर मृत्यूचा सापळा!

## रस्त्याच्या दुतर्फा 'येड्या बाभळी'चे जाळे अन मोठमोठ्या भेगा; वाहनधारक जीव मुठीत धरून करतायत प्रवास

**धारूर/प्रतिनिधी :** माजलगाव-धारूर राज्य महामार्ग हा मृत्यूचा सापळा बनला असून रस्त्याच्या दुतर्फा 'येड्या बाभळीं'चे जाळे अन मोठमोठ्या भेगा पडलेल्या आहेत. वाहनधारक जीव मुठीत धरून तारेवरची कसरत करत प्रवास करीत आहेत.लोकप्रतिनिधी अन् प्रशासनाला कधी येणार जाग? नागरिकांतु संतापजनक सवाल उपस्थित केला जात आहे.



माजलगाव ते धारूर या अत्यंत महत्त्वाच्या महामार्गाची सध्या दयनीय अवस्था झाली असून हा रस्ता वाहनधारकांसाठी अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे. रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड प्रमाणात वाढलेले येड्या बाभळींचे जाळे आणि सिमेंट रस्त्याचे तीन-तेरा वाजून रस्त्याला पडलेल्या मोठमोठ्या भेगांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत आहे. या परिस्थितीमुळे वाहनधारकांना आपला जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत आहे. लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणा या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने ''या लोकप्रतिनिधींना जाग कधी येणार?'' असा संतप्त सवाल या भागातील नागरिक आणि वाहनधारकांमधून विचारला जात आहे.

वाढलेल्या येड्या बाभळींमुळे वळणावरील काही दिसत नसल्याने अपघात होतात. माजलगाव-धारूर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना येड्या बाभळींची झुडपे इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत की, त्यांनी रस्त्याचा मोठा भाग व्यापला आहे. वळणावर समोरून येणारे वाहन दिसतच नाही, ज्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात घडत आहेत. तसेच, या काटेरी बाभळींच्या फांद्या थेट रस्त्यावर आल्याने दुचाकीस्वारांच्या अंगावर काटे लागून ते जखमी होण्याच्या घटना रोजच्याच झाल्या आहेत. रात्रीच्या वेळी तर या समस्येची तीव्रता आणखीनच भयानक बनते.

रस्त्यावर एक दिड फुटी भेगा अन् खड्डे केवळ बाभळींचे जाळेच नाही, तर रस्त्याच्या निकृष्ट दर्जामुळे सिमेंट रस्त्यावर पार भेगा पडल्या आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याला मोठ्या आणि खोल भेगा पडल्या आहेत. अवजड वाहने जेव्हा या भेगांवरून जातात, तेव्हा वाहनावरील नियंत्रण सुटून मोठा अपघात होण्याची भीती असते.

दुचाकीस्वारांची चाके या भेगांमध्ये अडकून गाड्या घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. पावसाळ्यात या भेगांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नाही, ज्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट होते.

**लोकप्रतिनिधी अन् प्रशासनाची धृतराष्ट्र भूमिका**

या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि रुग्णवाहिकांची ये-जा सुरू असते. तालुक्यातील लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी याच रस्त्यावरून अनेकदा ये-जा करतात. परंतु, लोकप्रतिनिधींनी या समस्येकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. ''निवडणुका आल्या की मतांचा जोगवा मागणारे लोकप्रतिनिधी आता कुठे गायब झाले आहेत?'' असा थेट सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत. एखाद्या मोठ्या दुर्घटनेत निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यावरच लोकप्रतिनिधींना जाग येणार का, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

**तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

या मार्गावरील येड्या बाभळींचे जाळे तात्काळ हटवून रस्त्याची योग्य दुरुस्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील प्रवाशांकडून केली जात आहे. प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी याकडे त्वरित लक्ष दिले नाही, तर लवकरच रस्त्यावर उतरून तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनधारकांनी दिला आहे.

# चालक सीटवर प्रवासी बसवणाऱ्या ३९ ऑटो रिक्षांवर कारवाई, १ लाख तीस हजार दंड वसूल

## प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि वाहतूक पोलिसांची लातूरमध्ये धडक कारवाई



**लातूर/ प्रतिनिधी:** जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जुलै २०२६ रोजी लातूर येथील शिवाजी चौक परिसरात प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वायुवेग पथक आणि लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांच्या वतीने संयुक्त विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. लातूर शहरामध्ये ऑटोरिक्षा चालकांकडून वाहनांच्या आसन व्यवस्थेत अनाधिकृत बदल करून चालकाच्या शेजारी प्रवासी बसवणे तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून नागरिकांची सुरक्षा धोक्यात आणली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम हाती घेण्यात आली होती.

या मोहिमेत मोटर वाहन निरीक्षक प्रकाश मुळे व अमोल कोकरे, तसेच सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक दिपाली जाधव, राहुल देवगुंड आणि प्रवीण दरेकर यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या कारवाईदरम्यान वाहनांच्या रचनेत अनाधिकृत फेरफार करणाऱ्या आणि धोकादायक रीतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या एकूण ३९ ऑटोरिक्षांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कडक कारवाई करत १ लाख ३० हजार रुपये इतका दंडात्मक महसूल वसूल करण्यात आला.

कारवाईदरम्यान लातूरचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे आणि लातूर शहराचे पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांनी ऑटोरिक्षा चालकांशी संवाद साधला. त्यांनी चालकांना प्रवाशांच्या सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देत, भविष्यात प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होईल, अशा प्रकारे नियमबाह्य वाहतूक केल्यास याहून अधिक कठोर कारवाई केली जाईल असा इशारा दिला, तसेच मोटार वाहन कायदे व रस्ता सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे आयोजित

# विविध आरोग्य उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/ प्रतिनिधी:** मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त व दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान, सर्वरोग निदान, कर्करोग तपासणी शिबिरे आणि जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाह्यरुग्ण विभागात सकाळी ८:३० ते दुपारी १ या वेळेत स्तन कर्करोग, गर्भाशय मुख कर्करोग, नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तसेच हाडांच्या घनतेची तपासणी शिबिर पार पडले. यावेळी रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार व पुढील मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी उदगीरचे आमदार संजय बनसोडे, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, उप अधिष्ठाता डॉ. मंगेश सेलुकर, डॉ. महादेव बनसुडे, डॉ. अजय ओव्हाळ, डॉ. उमेश कानडे, विशेष कार्य अधिकारी डॉ. सुनील होळीकर आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांची प्रमुख उपस्थिती होती.

याच उपक्रमाचा भाग म्हणून औसा तालुक्यातील किल्लारी येथील ग्रामीण रुग्णालयात औसाचे आमदार अभिमन्यू पवार, अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, नोडल ऑफिसर डॉ. सचिन जाधव व प्रभारी रक्तपेढी प्रमुख डॉ. शिवराज कंठीकर, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे परिक्षित पवार यांच्या उपस्थितीत सर्वरोग निदान शिबिर पार पडले, तर लातूर शहरातील प्रभाग क्रमांक १५, ग्रीन बेल्ट, न्यू आदर्श कॉलनी येथे सर्वरोग निदान शिबिर आणि स्वेच्छा रक्तदान शिबिर पार पडले.

नोडल अधिकारी डॉ. नम्रता आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात व्यापक जनजागृती अभियान राबवण्यात आले. यामध्ये किल्लारी व आदर्श कॉलनी येथे पोस्टर प्रदर्शन, जिल्हा परिषद शाळा किल्लारी येथे विद्यार्थी व शिक्षकांना असंसर्गजन्य आजार, उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलता, पोषण आणि अमली पदार्थांच्या सेवनाबाबत मार्गदर्शन, तसेच पटेल चौक व मुरुड येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी बीपी, शुगर, बीएमआय स्क्रीनिंग आणि व्यसनमुक्ती जनजागृती सत्रांचा समावेश होता.

या सर्व शिबिरांच्या माध्यमातून ३०१ नागरिकांची हाड तपासणी, १६९ महिलांची स्तन कर्करोग तपासणी, २५८ रुग्णांची नेत्ररोग तपासणी, ७० लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड वाटप आणि ४२६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. अशा प्रकारे एकूण १ हजार ४०४ रुग्णांनी वैद्यकीय सेवांचा प्रत्यक्ष लाभ घेतला. समाजहिताच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या सर्व उपक्रमांना नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते यांनी सर्व नागरिक, रक्तदाते, डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय कर्मचारी, समाजसेवा अधीक्षक व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानले.

## दशनाम गोसावी समाज लातूरच्या वतीने २ ऑगस्ट रोजी भव्य पंचसूत्री कार्यक्रमाचे आयोजन

**लातूर/ प्रतिनिधी:** दशनाम गोसावी समाज प्रतिष्ठान लातूर ही सामाजिक संस्था गेली २९ वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवते. याचाच एक भाग म्हणून प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी दशनाम गोसावी समाज, लातूरच्या वतीने रविवार, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी एका विशेष पंचसूत्री कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा सकाळी १०:०० वाजता लातूर येथील भालचंद्र ब्लड बँक सभागृहात संपन्न होईल.

या प्रेरणादायी आणि गौरवशाली कार्यक्रमात समाजातील विविध घटकांसाठी पाच प्रमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा, शासकीय व खाजगी सेवेतून निवृत्त झालेल्या समाज बंधू-भगिनींचा विशेष सन्मान, आणि समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना राज्य समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यासोबतच, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना भारती फाउंडेशनच्या वतीने शैक्षणिक साहित्य व स्कॉलरशिप वाटप केली जाईल, तसेच उपस्थित समाज बांधवांसाठी समाज प्रबोधन व मार्गदर्शनाचा विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ह.भ.प. मा. श्री महादेव महाराज चाकरवाडीकर लाभणार असून, अध्यक्षस्थान श्री स्वप्नील (भैय्या) भारती (परभणी) भूषवणार आहेत. झी टीव्ही फेम प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. श्री अविनाश भारती महाराज हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करतील.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री सूर्यकांत गिरी-गोसावी (पुणे), श्री सुखदेव गिरी (कोल्हापूर),श्री अनुप गोसावी (नाशिक)श्री मुन्नागीर गोसावी (पंढरपूर),श्री ओमप्रकाश गिरी (बीड) आणि श्री गणेश पुरी (नागपूर) यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. त्याअनुषंगाने ९९२०६ २११११ (मयूर भरती प्रॉपर्टीज ऑफिस) या क्रमांकावर गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मार्क मेमोसह नोंदणी करावी, तसेच या सोहळ्यास दशनाम गोसावी समाजातील सर्व समाज बांधव, भगिनी, आणि युवक-युवतींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे नम्र आवाहन दशनाम गोसावी समाज, लातूरच्या वतीने करण्यात आले आहे.

# दादापीर नगरमधील महिला व नागरिकांचा नगर पालिकेवर धडक मोर्चा!

## मुख्याधिकारी, आधी रस्ता द्या नाहीतर खुर्ची खाली करा!

## निलंग्यात प्रशासनाच्या संवेदनाहीन कारभारावर संतापाचा लाव्हा फुटला

**निलंगा/प्रतिनिधी :** आमच्या हक्काचा रस्ता कुठे आहे? आमच्या लेकरांना चिखलातून शाळेत पाठवायचे का? कर भरूनही आमच्या नशिबी फक्त नरकयातनाच का? असा आर्त आणि संतप्त सवाल करत आज लातूर जिल्ह्यातील निलंगा शहरा अंतर्गत येणाऱ्या दादापीर नगर परिसरातील शेकडो नागरिक, माता-भगिनी आणि शालेय विद्यार्थ्यांनी थेट दादापीर परिसरापासून नगर पालिकेपर्यंत भव्य व धडक मोर्चा काढला. अंगावर काटा आणणाऱ्या चिखलातून आणि सांडपाण्याच्या डबक्यातून वाट काढत निघालेल्या या विशाल जनक्षोभाने नगर परिषदेच्या प्रवेशद्वारावर धडक देत प्रशासनाच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली आणि अक्षम्य दुर्लक्षाबद्दल प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर टीकेची तोफ डागली. आज एकविसाव्या शतकात आपण प्रगतीच्या आणि विकासाच्या कितीही वल्गना करत असलो, तरी निलंगा नगरपालिकेच्या दावेदारांच्या नाकाखाली असलेल्या दादापीर नगरमधील वास्तव मात्र अत्यंत विदारक आणि मानवतेला कलंक लावणारे आहे. परिसरातील रस्ते म्हणजे केवळ खड्डे आणि गुडघ्यापर्यंत साचलेला चिखल बनले आहेत. पावसाळ्याचे दिवस असोत वा शहरात चाललेली अस्ताव्यस्त ड्रेनेजची कामे असोत, या दोन्हीचा सर्वाधिक आणि जीवघेणा फटका या गरीब वस्तीला बसला आहे. सकाळी पाठीवर स्कूल बॅग घेऊन जाणारी लहान बाळगोपाळ मुले, वृद्ध आई-वडील आणि हातावर पोट असणारे कामगार याच जीवघेण्या चिखलातून पाय घसरून पडत आहेत. दुचाकी गाड्या जागीच रुतत आहेत. सांडपाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने संपूर्ण परिसरात आरोग्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. असे असतानाही, जनतेच्या करावर मलिदा खाणारे अधिकारी आणि कुंभकर्णी झोपेत असलेली नगर पालिकेची यंत्रणा अजून किती जणांचे जीव जाण्याची वाट बघत आहे? असा संतप्त सवाल मोर्चेकऱ्यांनी उपस्थित केला. आम्ही या देशाचे नागरिक नाही का? प्रशासनावर प्रश्नांची सरबत्ती वारंवार निवेदने देऊन, चप्पल झिजवूनही जेव्हा प्रशासनाला जाग आली नाही, तेव्हा नाइलाजास्तव दादापीर नगरवासीयांना रस्त्यावर उतरून मोर्चा काढण्याची वेळ आली. तुम्ही निवडणुकीच्या वेळी मते मागताना याच जनतेचे उंबरठे झिजवता, मग आज आमच्या लेकरांच्या वाट्याला हा चिखल आणि घाण का आली? अशी तोफ डागत महिलांनी प्रशासनाच्या संवेदनाहीन कारभाराचा तीव्र शब्दांत निषेध केला.

शोषित आणि पीडित दादापीर नगरवासीयांच्या पाठीशी खंबीरपणे उरत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या लातूर जिल्हा मुख्य कार्यकारी युवती अध्यक्ष सौ. विशाखा रोहित हतागळे यांनी प्रशासनाला थेट आणि अंतिम इशारा दिला आहे.व खालील मागण्या केल्या आहेत.त्या प्रामुख्याने दादापीर नगर परिसरातील रस्त्यांवर तात्काळ मुरुम टाकण्यात यावा आणि पक्के रस्ते व नालीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात यावे.रस्त्यावरील लाईटची व्यवस्था करण्यात यावी सांडपाण्याचे योग्य नियोजन करावे. यासह अनेक मागण्या करण्यात आल्या आहेत.



याबाबत प्रशासनाने जर आताही गांभीर्य दाखवले नाही, तर याहूनही अधिक तीव्र जनआंदोलन छेडले जाईल आणि नगर परिषदेच्या कार्यालयाला कुलूप लावले जाईल, असा गर्भित व तीव्र इशारा यावेळी देण्यात आला. या मोर्चात राधा कर्मवीर कुशल, सोनाली तळेकर, पंदिनी सोनटक्के, छाया विहिरे, मन्नाबी शेख, तनुजा पवार, आशिया खुरेशी यांच्यासह दादापीर नगर परिसरातील शेकडो नागरिक, महिला व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या धडक मोर्चानंतर आतातरी प्रशासनाचे डोळे उघडणार का आणि दादापीर नगरच्या नशिबी आलेला हा चिखल पुसला जाणार का, याकडे संपूर्ण निलंगा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव येथे अजित दादा पवार यांना अभिवादन आणि मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त आंबा वृक्षारोपण



**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे हे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षांच्या हस्ते अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर शिरूर अनंतपाळ पंचायत समिती सभापती संजय सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून शाळेमध्ये फळांचा राजा आंबा या वृक्षाची लागवड करण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे तंटामुक्ती अध्यक्ष अमोल भिंगोले, विनायक पाटील, अमोल काळे, दिलीप सूर्यवंशी, भैय्यासाहेब गायकवाड, आनंद मोहिते, श्रीमंत बन,निलेश सूर्यवंशी ,अंगणवाडी कार्यकर्ती पुष्पलता सूर्यवंशी, रेणुका गायकवाड, लक्ष्मीबाई जाधव , शाळेच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख शितल काळे मॅडम सह मुख्याध्यापक रवी कुरील आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची कृष्णा सहकारी साखर कारखान्यास सदिच्छा भेट; कारखान्याची केली पाहणी



**लातूर/ प्रतिनिधी:** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी सातारा जिल्ह्यातील कराड येथील कृष्णा सहकारी साखर कारखान्यास सदिच्छा भेट दिली विविध विषयावर चर्चा केली तसेच कारखान्याची पाहणी केली. यावेळी कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ सुरेशबाबा भोसले, कृष्णा सहकारी बँकेचे चेअरमन तथा कराड दक्षिण चे आमदार डॉ अतुलबाबा भोसले यांच्या सह कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे सन्माननीय संचालक मंडळ,विविध खाते प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## माजी सैनिक, पत्नी, पाल्य यांनी विशेष गौरव पुरस्कारासाठी १५ सप्टेंबरपर्यंत माहिती सादर करण्याचे आवाहन

**लातूर/ प्रतिनिधी:** विविध क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या पत्नी आणि पाल्यांना सैनिक कल्याण विभागातर्फे विशेष गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप एकल रक्कम २० हजार ते रुपये १ लाख रुपये असे आहे.

या पुरस्कारासाठी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी, साहित्य, संगीत, गायन व नृत्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नैसर्गिक आपत्तीच्या काळात केलेली बहुमोल मदत, इयत्ता दहावीमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त व बारावी परीक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी, तसेच यशस्वी उद्योजक, सामाजिक कार्य आणि पर्यावरण विषयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा समावेश असणार आहे. तरी जिल्ह्यातील पात्र माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांनी विहित नमुन्यातील अर्ज १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे जमा करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांचे स्वागत



**लातूर/ प्रतिनिधी:** धाराशिवचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांची लातूर येथे त्याच पदावर बदली झाली आहे. नुकताच त्यांनी पदभार स्वीकारला असता राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी अधीक्षक व्ही. आर. काळे, ज्ञानेश्वर गोसावी, विजयकुमार धनशेट्टी, वासंती काळे, पूजा भोसले, सतीश श्रीमंगले, गोविंद गुट्टे, प्रभाकर सूर्यवंशी, उमाकांत गायकवाड, शिवकांत वाडीकर, अनिल वाघमारे आदि उपस्थित होते.यावेळी औताडे व प्राचार्य केंद्रे यांनी जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तांत्रिक शाळा आणि अल्प मुदतीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांबाबत चर्चा झाली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.